# कमला कॉलेजमध्ये जागतिक पर्यावरण दिन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ताराराणी विद्यापीठाचे कमला कॉलेज येथे निसर्ग मंडळ अंतर्गत जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने सामूहिक पर्यावरण संरक्षण प्रतिज्ञा घेण्यात आली.

विद्यार्थिनींना पर्यावरण जागृतीसंदर्भात लघुपट दाखवण्यात आले. तसेच चळवळीचे प्रणेते नितीन डोईफोडे यांचे 'पर्यावरण आणीबाणीचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

उपक्रमासाठी कॉलेजच्या प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांचे मार्गदर्शन लाभले. प्रास्ताविक निसर्ग मंडळाच्या समन्वयिका प्रा. डॉ. नीता धुमाळ यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मेघा निकम यांनी केले. आभार प्रा. स्वाती कांबळे यांनी मानले, प्रा. अमृता दिंडे व प्रा. स्नेहल घोरपडे यांनी नियोजन केले होते.

Scanned by CamScanner